# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर

## "हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"

## अंतर्गत कंत्राटी तत्वावर पदभरतीकरीता जाहीरात

## सन २०२३-२४

" **हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना** "अंतर्गत नागपूर जिल्हा करीता खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वांवर खालील रिक्त पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | कार्यक्रमाचे नांव | मंजुर पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | नियुक्तीचे ठिकाण | प्रवर्ग | शेक्षणिक पात्रता | वय मर्यादा | दरमहा एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | HBT आपला दवाखाना | Medical Officer | 48 | भिवापुर हिंगणा काटोल नरखेड कळमेश्वर (सर्व ग्रामिण) | SC-7 ST-3 VJ-A-2 NT-B-1 NT-C-1 NT-D-1 SBC-1 OBC-9 EWS-5 Open-18 | MBBS Registered to Maharashtra Medical Council<br><br>**उपलब्ध न झाल्यास** | ४३ वर्ष मागास वर्गीय प्रवर्गा साठी/ ३८ वर्ष खुला प्रवर्ग तथा एमबीबीएस यांची वयोमार्यादा ७० वर्ष | Rs. 60,000/- |
| | | | | | | BAMS Registered to Maharashtra Council of Indian Medicine | ४३ वर्ष मागास वर्गीय प्रवर्गा साठी/ ३८ वर्ष | रु. २५०००/- आणि रु १५०००/-PBI असे एकुण रु ४००००/- प्रति महीणा मानधन CPHC मार्गदर्शक सुचनानुसार |
| २ | HBT आपला दवाखाना | Staff Nurse | 45 | नरखेड कळमेश्वर (सर्व ग्रामिण) | SC-7 ST-2 VJ-A-1 NT-B-1 NT-C-1 NT-D-1 SBC-1 OBC-7 EWS-5 Open-19 | 1. General Nursing Course 3 & ½ Years from Govt. Recognised Institution Registration & Diploma of Maharashtra Nursing Council<br>2. B.Sc Nursing | ४३ वर्ष मागास वर्गीय प्रवर्गा साठी/ ३८ वर्ष | Rs. 20,000/- |

| अ क्र | कार्यक्रमाचे नांव | मंजुर पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | नियुक्तीचे ठिकाण | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | वय मर्यादा | दरमहा एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | HBT आपला दवाखाना | MPW-Male | 49 | भिवापुर<br>नरखेड<br>कळमेश्वर<br>वाडी<br>रामटेक<br>उमरेड<br>(सर्व ग्रामिण) | SC-6<br>ST-4<br>VJ-A-1<br>NT-B-1<br>NT-C-2<br>NT-D-1<br>SBC-1<br>OBC-10<br>EWS-5<br>Open-18 | १.विज्ञान शाखेतुन उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र प्ररिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषित केलेली इतर कोणतीही परिक्षा उत्तीर्ण<br>२. विभागाचा आरोग्य आणि कु.क.प्र.केन्द्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकिय मुलभुत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कु.क. मंत्रालयाने मान्यता दिलेले स्वच्छता निरिक्षक (सॅनीटरी इन्पेक्टर) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनीटरी इन्पेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | ४३ वर्ष मागास वर्गीय प्रवर्गा साठी/ ३८ वर्ष | Rs. 18,000/- |
| एकूण रिक्त पदे - | | | १४२ | | | | | |

**अटी व शर्ती -**

२) सविस्तर जाहिरात अटी, शर्ती तथा अर्जासह **www.nagpurzp.com** वर उपलब्ध आहे.

२) वरील पदांबाबत भरतीप्रक्रिये संबंधीत संपूर्ण अद्यावत माहिती व अद्यावत यादी **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. प्रत्यक्ष कार्यालयात कोणीही संपर्क साधु नये.

**आवश्यक कागदपत्रे :-** खालील कागपत्रांची मुळ प्रतीची छायांकिंत प्रत स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१) पदवी/पदविका प्रमाणपत्रे २) गुणपत्रिका (सर्व) ३) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे ४) संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र ५) जातीचे प्रमाणपत्र ६) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ७) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र ८) वैद्यकिय अधिकारी/स्टाफ नर्स पदाकरीता रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ९) पासपोर्ट आकाराचा फोटो १०) RTGS / NEFT /IMPS व्दारे अर्जशुल्काचा भरणा केल्याची पावती.

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक :- दि २८/०२/२०२४** सायंकाळी ६.०० पर्यत

**- अर्ज स्विकारण्याचे ठिकाण खालीलप्रमाणे -**

| अ.क्र | पदाचे नांव | अर्ज स्विकारण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | Medical Officer | राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर |
| २ | Staff Nurse | |
| ३ | MPW | |

टिप -अ) वरीलपैकी पदांकरीता पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल. जर सदर दिवशी शासकिय सुट्टी असल्यास दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल.

ब) MBBS अर्हताधारक उमेदवारास प्राधान्य असल्याने,प्रकाशित जाहीरातीच्या अनुषंगाने BAMS अर्हता धारक उमेदवारास राज्यस्तरावरुन प्राप्त सुचनेप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. वरील "अ" प्रमाणे MBBS अर्हताधारक उमेदवार प्राप्त झाल्यास,प्रकाशित जाहीरातीच्या अनुषंगाने नियुक्ती देण्यात आलेल्या BAMS उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात येईल.त्याकरीता कार्यमुक्तीबाबत वेगळे कळविण्यात येणार नाही.

क) प्रकाशित जाहीरातीच्या अनुषंगाने BAMS अर्हता धारक उमेदवार प्राप्त न झाल्यास, दि २६/०२/२०२४ ते दि ०१/०३/२०२४ याकालावधीत BAMS अर्हता धारक उमेदवारांनी राष्ट्रीय आरोग्य अभियान,आरोग्य विभाग जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन,नागपूर येथे अर्ज सादर करावे.याकार्यालयास प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने,गुणवत्ता यादी प्रकाशित करण्यात येईल व रिक्त पदांनुसार समुपदेशनद्वारे पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येईल.

**नोंदणी/मुलाखत स्थळ** :- राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,सिव्हिल लाईन, नागपूर

**अटी व शर्ती-**

१. वरील सर्व पदे हि **निव्वळ कंत्राटी स्वरुपाची** असुन त्यांचा कालावधी दि. २९/०६/२०२४ पर्यत राहील. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतू सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.
२. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. म्हणून अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
३. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
४. उपरोक्त सर्व पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.
५. सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवू शकतो.
६. अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस प्राधान्य दिले जाईल.
७. जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष, मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील तथा एमबीबीएस यांची वयोमार्यादा ७० वर्ष राहील.
८. उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही थेट मुलाखतीव्दारे घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमूद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.
९. संबंधित पदाकरीता नोंदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयात सुचना फलकावर तथा कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबंधी आक्षेप असल्यास वरील नमूद प्रमाणे सकाळी १० ते ५ पर्यत घेवून निराकरण केले जाईल त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.
१०. अर्जदाराला सोईनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.
११. उपरोक्त संबंधीत पदाकरीता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरवल्या जाईल.
१२. ज्या आशा स्वयंसेविकांनी जीएनएम कोर्स पुर्ण केलेला आहे त्यांना जीएनएम पदभरतीमध्ये वयाची अट राहणार नाही व पदभरतीमध्ये प्राधान्य देण्यात येईल.
१३. एकापेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत असल्यास उमेदवाराने अर्ज करण्यात येवू नये. निवड उपरांत तत्सम बाब कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास नियुक्ती तात्काळ रदद् करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.
१४. मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुइलाही भत्ता देय राहणार नाही.
१५. अ.क्र. १ वरील नमूद पदाकरीता मेरीट लिस्ट तयार करतांना खालीलप्रमाणे गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

A) Subject Knowledge (10)
B) "Research & Academic Knowledge (10)"
C) Leadership Quality (10)
D) Administrative Abilities (10)
E) Experience (10)
F) For Govt. Experience-2 marks for one year
G) For Private Experience-1 marks for one year

**Total Experience-10 marks Maximum.**

यानुसार सर्व उमेदवारांचे गुण एकत्र करुन मेरीटलिस्ट तयार करण्यात येईल.

अ.क्र. २ व ३ वरील पदांकरीता खालीलप्रमाणे गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक (Qualifying exam) मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 50% प्रमाणे proportion=60X50/100= 30) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१ Staff Nurse पदाची आवश्यक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षाचे 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 20% प्रमाणे proportion = 60X20/100 = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव (शासकिय, निमशासकिय किंवा रा. आ.अ. अंतर्गत) | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकूण १००गुण |

अ) यानुसार सर्व उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

ब) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवाराचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

१६. अ.क्र. १ च्या पदाकरीता MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास वैद्यकिय अधिकारी म्हणून MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यत अथवा ६ ते ११ महिण्याकरीता BAMS पदवीधारक उमेदवारास वैद्यकिय अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

१७. ११) BAMS पदवीधारक वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती रा.आ.अ. अंतर्गत मनुष्यबळ विभागाचे दि.०९/०६/२०२३ रोजीचे पत्र क्र. जा.क्र. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष /पदभरती /३४३५४-७०१/२०२३ नुसारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात यावी.

१८. १२) सदर BAMS पदवीधारक वैद्यकिय अधिकारी पदाकरीता केंद्र शासनाच्या CPHC च्या मार्गदर्शक सुचनांनुसार रु.२५,०००/- अधिक रु.१५,०००/- (PBI) कामावर आधारीत मोबदला याप्रमाणे प्रति महिना रु.४०,०००/- मानधन मार्गदर्शक सुचनांनुसार अदा करण्यात यावे.

१९. मा.मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक कार्यालय, नागपूर यांच्या बिंदुनामावलीप्रमाणे आरक्षणामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कोणतीही पुर्व सुचना न देता कमी करण्यात येईल.

२०. बिंदु नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती जाहिरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेव्दारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदाच्या भरतीची

आवश्यकता लक्षात घेवून ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

२१. शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा ६५ वर्ष असेल तसेच अनुभवास प्राधान्य असेल. वर्ग -३ व वर्ग-४ च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि. १७/१२/२०१६ रोजीच्या शासननिर्णयाव्दारे अपात्र आहेत.

२२. सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र./१००/१३ दि. १७/१२/२०१६ नुसार अदा करण्यात येईल. (गट क व गट ड वगळता)

२३. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

२४. अ.क्र. १ व २ वरील पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्यांची उपसंचालक स्तरावर/जिल्हास्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

२५. मागासर्वीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु. १५०/- चे बॅक ऑफ

महाराष्ट्र बॅकेचे **जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर खाते क्र.** 60403391534, IFSC Code – MAHB0001321 **वर** RTGS / NEFT / IMPS **व्दारे** भरणा करुन पावती फार्म सोबत जोडावे. .

२६. ज्या पदाकरीता आवश्यक अनुभव मागीतलेला आहे परंतू आवश्यक अनुभव असलेले उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुभवाची अट शिथील करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखीव असतील.

२७. संपूर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल. भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद् करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, निवड समिती, रा.आ.अ. नागपूर यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

२८. **नागपूर महानगरपालिका क्षेत्रात आपला दवाखाना कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेत आहे.करीता नागपूर ग्रामिण क्षेत्रातील आपला दवाखाना मधील रिक्त पदे सद्यस्थितीत भरण्यात येईल व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील आपला दवाखाना कार्यान्वित झाल्यानंतर तेथिल पदे भरण्यात येईल व त्याबाबत प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.**

२९. आपला दवाखाना केंद्राकरीता वैद्यकिय अधिकारी म्हणुन MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत BAMS पदवीधारक उमेदवारास वैद्यकिय अधिकारी म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.सदर पदावर MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध झाल्यास BAMS पदवीधारक उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात येईल.

जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय,नागपूर

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नागपूर